# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर ,
४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे(पूर्व) ,मुंबई ५१.
फोन नं.२६४७ ४८९२ टेलीफॅक्स नं.२६४७ १६१९
ई-मेल- jtdirrom@gmail.com website – www.jdteromumbai.com


परिपत्रक
**ऑनलाईन अर्जांबाबत**

क्र. २/विकामुं/तंशि/इबीसी/२०१५/३६५

दिनांक : 29 DEC 2015

प्रति,
सर्व खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित
एमबीए, एमसीए, अभियांत्रिकी पदवी/पदविका,
औषधनिर्माणशास्त्र पदवी/पदविका महाविद्यालये.

विषय : खाजगी विनाअनुदानीत व कायम विनाअनुदानीत शिक्षण संस्थेमध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या ५० टक्के प्रतिपूर्तीबाबत. . . . . . . . . . . . .
**(शैक्षणिक वर्ष २०१५-१६ करिता ऑनलाईन अर्ज भरुन घेणे)**

संदर्भ : या कार्यालयाचे परिपत्रक १. क्र. ४/विकामुं/तंशि/ईबीसी/२०१५/२६६१, दि. १५/९/२०१५
२. क्र. ४/विकामुं/तंशि/ईबीसी/२०१५/२६८८, दि. २३/९/२०१५
३. दि. ३०/९/२१५ रोजीचा ईबीसी ओरिएंटेशन प्रोग्राम शै.व. २०१५-१६
४. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्र. १५/तंशिसं/अर्थसं/ईबीसी/ऑनलाईन/२०१५-१६/२१८, दि. १६/१२/२०१५

संदर्भीय क्र.४च्या पत्रान्वये सर्व खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित एमबीए, एमसीए, अभियांत्रिकी पदवी/पदविका, औषधनिर्माणशास्त्र पदवी/पदविका महाविद्यालयांना कळविण्यांत येते की, शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये प्रवेशित आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या ५० टक्के प्रतिपूर्तीबाबतचे ऑनलाईन अर्ज तंत्रशिक्षण संचालनालयाच्या संकेतस्थळावरील EBC Concession या लिंकवर भरुन घेण्याकरिताची तरतूद उपलब्ध करुन देण्यांत आली आहे. सदर अर्ज भरुन घेण्याचा कालावधी दि. १५/०१/२०१६ पर्यंत ठेवण्यांत आला आहे. दि. १६/०१/२०१६ ते २०/०१/२०१६ पर्यंत संस्थांनी प्राप्त झालेल्या ऑनलाईन फॉर्म्सची छाननी करुन सदर अर्ज ऑनलाईन फॉरवर्ड करण्याची कार्यवाही पूर्ण करायची आहे.

ज्या संस्थांनी ऑफलाईन अर्ज सादर केलेले आहेत. अशा सर्व संस्थांना कळविण्यांत येते की, **ऑनलाईन फॉर्म भरुन घेण्याकरिता ऑफलाईन फॉर्म सोबत जोडलेल्या कागदपत्रांची संदर्भाकरिता आवश्यकता असल्यास संस्थानी त्यांच्या सादर केलेल्या फाईल्स त्वरित घेऊन जाव्यात व कोणत्याही परिस्थितीत दि. १५/०१/२०१५ पर्यंत विद्यार्थ्यांचे ऑनलाईन फॉर्म्स भरुन घ्यावेत. एकही विद्यार्थी ऑनलाईन फॉर्म्स अभावी वंचित रहाणार नाही. याची सर्व संस्थांनी दक्षता घ्यायची आहे.** त्याकरिता संस्थांनी त्यांच्या सूचना फलकावर त्याबाबतची सूचना लावावी. बऱ्याच संस्थांमध्ये सध्या नाताळ व्हॅकेशन सुरु आहे. परंतु दि. ०४/०१/२०१६ पासून सर्व संस्थातील विद्यार्थ्यांचे वर्ग नेहमीप्रमाणे सरु होणार आहेत. व्हॅकेशन नंतर नियमीत वर्ग सुरु झाल्यानंतर सदर सूचना एक आठवडाभर संबंधीत वर्गातील विद्यार्थ्यांना त्यांच्या वर्गामध्ये वाचून दाखवाव्यात जेणेकरुन विद्यार्थ्यांना ऑनलाईन फॉर्म्स भरण्याबाबतची माहिती होणे सोयीस्कर होईल.

१. ज्या संस्थांनी याआधीच ऑफलाईन फॉर्म सादर केलेले आहेत. परंतु या कार्यालयातून फाईल्स नेलेल्या नाहीत. अशा संस्थातील विद्यार्थ्यांच्या **ऑनलाईन अर्जाच्या मूळ प्रती व रिसिट कम ॲकनॉलेजमेंटच्या प्रती ऑफलाईन अर्जासोबत जोडणे अनिवार्य आहे.** त्याकरिता संस्थांनी या कार्यालयात येऊन सदर प्रती त्यांच्या फाईलमध्ये विद्यार्थीनिहाय जोडाव्यात.

२. ज्या संस्थांनी त्यांचे ऑफलाईन अर्ज परत नेले आहेत. अशा संस्थांनी ऑनलाईन अर्ज व त्यासोबत आवश्यक असलेली रिसिट कम ॲकनॉलेजमेंट जोडूनच सर्व मूळ कागदपत्रांसह त्यांचे अर्ज सादर करावेत.

३. ज्यावेळेस ऑनलाईन फॉर्म्स भरण्याबाबतची लिंक दिली जाईल त्यावेळेस विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन फॉर्म्सही भरुन घ्यावे लागतील, याबाबतच्या सविस्तर सूचना या अगोदर निर्गमित केलेल्या विविध परिपत्रकांतून तसेच ओरिएंटेशन प्रोग्राम मधून संस्थांना दिलेल्या आहेतच. त्यानुसार सर्व संस्थांनी कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

...२.

४. ऑफलाईन फॉर्म्स सादर करताना संस्थांनी विद्यार्थ्यांचे एकत्रित विवरणपत्र एक्सेल शिट मध्ये सादर केलेले आहे, परंतु आता ऑनलाईन अर्जांची प्रक्रिया सुरु केल्याने सर्व संस्थांनी ऑनलाईन विवरणपत्राच्या २ प्रती सादर करणे आवश्यक आहे.

ऑनलाईन अर्जासोबत खालील कागदपत्रे असणे अनिवार्य आहे.
**(ज्या संस्थांनी या आधीच ऑफलाईन फॉर्मसोबत मूळ कागदपत्रे सादर केली आहेत. त्यांनी पुन्हा कागदपत्र सादर करण्याची आवश्यकता नाही.)**

१. ऑनलाईन अर्ज
**(अर्जाच्या शेवटी विद्यार्थी व विद्यार्थ्याच्या पालकाची स्वाक्षरी व त्याखाली प्राचार्य/संचालकांची स्वाक्षरी अनिवार्य आहे.)**
२. ऑनलाईन अर्जाची रिसिट कम ॲकनॉलेजमेंट
**(अर्जाच्या शेवटी केवळ प्राचार्य/संचालकांची स्वाक्षरी असणे अनिवार्य आहे.)**
३. मूळ उत्पन्नाचा दाखला
४. डोमिसाईल सर्टिफिकेट किंवा लिव्हींग सर्टीफिकेट (दोन्ही सर्टिफिकेट्स उपलब्ध नसतील तरच जन्म दाखला)
५. मागिल वर्षाच्या गुणपत्रिका (विद्यार्थ्याच्या गुणपत्रिकेवर FAIL असे नमूद केलेले असल्यास पुढील वर्षात प्रवेशासाठी पात्र असल्याबाबतचे प्राचार्यांचे साक्षांकन [Attestation] असणे अनिवार्य आहे.)
६. रेशनकार्डची छायांकीत प्रत
७. गॅप असल्यास मूळ प्रतिज्ञापत्राची नोटरी असलेली प्रत (Original affidavit should be submit)
८. शैक्षणिक वर्ष २०१५-१६ ची शुल्क जमा पावती
९. वडील हयात नसल्यास मृत्यू दाखला (आईच्या नावे उत्पन्नाचा दाखला असल्यास)
१०. आधार कार्डाची छायांकीत प्रत
११. पासबुकची छायांकीत प्रत (पासबुक केवळ विद्यार्थ्यांच्या नावे असावे. संयुक्त खाते असलेल्या पासबुकची प्रत नसावी.)
१२. ५० टक्के शिक्षण शुल्कापेक्षा उत्पन्न कमी असल्यास ज्यांच्याकडून अर्थसहाय्य घेतले त्यांचे मूळ प्रतिज्ञापत्र / शैक्षणिक कर्ज घेतले असल्यास बँकेचे प्रमाणपत्र
१३. स्वयं सांक्षाकन घोषणापत्र (विद्यार्थ्याने स्वयं सांक्षाकन केले असल्यास)
१४. केंद्रिभूत प्रवेश घेतलेल्या अलॉटमेंट लेटरची प्रत

**ऑनलाईन फॉर्म्स या कार्यालयाकडे सादर करण्याबाबतचे वेळापत्रक जानेवारी-२०१६च्या ३ऱ्या आठवड्यात संस्थांना कळविले जाईल.**

सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई
यांचेकरिता